# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा

सातारा तालुका पोलीस ठाणे
संपर्क- 02162-238607
ईमेल- sataratps.satara@mahapolice.gov.in

दिनांक :- 12/04/2026

## प्रेसनोट

### -: खुनाच्या गुन्हयातील आरोपीला 4 तासांच्या आत सातारा तालुका पोलीसांनी ठोकल्या बेडया :-

**(सातारा तालुका पोलीस ठाणे डी.बी पथकाची कामगिरी)**

सातारा तालुका पोलीस ठाणे दिनांक १२/०४/२०२६ रोजी फिर्यादी मौजे आरफळ तालुका जिल्हा सातारा गावचे हद्दीत गावंधर नावाच्या शिवारात काम करत असताना गावातील काही मुले पेट्रोल काढत असतानाचा व्हिडीओ गावात व्हायरल करु नको विनाकारण मुलांना बदनाम करु नको असे फिर्यादीचे पती बोलल्यामुळे त्याचा राग मनात धरुन रागाच्या भरात डोक्यात खोऱ्याने मारुन खुन केला त्याबाबतचा गुन्हा दाखल केला होता.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक सो, सातारा, तुषार दोशी, मा.अपर पोलीस अधीक्षक सो, सातारा, श्रीमती वैशाली कडुकर, मा. उपविभागीय अधिकारी सातारा विभाग, सातारा श्री राजीव नवले यांचे मार्गदर्शनाखाली **सातारा तालुका पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी श्री निलेश तांबे** यांनी सदर खुनाचा गुन्हा उघडकीस आणुन गुन्हयातील आरोपीस तात्काळ ताब्यात घेणेबाबत सुचना दिल्याने सातारा तालुका पोलीस ठाणेचे डी. बी. पथकाने सदर आरोपीची गोपनिय माहिती मिळवुन एक संशयित इसम याला शिवथर येथुन ताब्यात घेऊन त्यांच्याकडे कसोशीने चौकशी केली असता चौकशी दरम्यान सदर आरोपी याने खुन केलेची कबुली दिली आहे. तसेच आरोपी यांचेकडुन गुन्हयात वापरलेले हत्यार, मोबाईल, दुचाकी वाहन ताब्यात घेऊन सदर गुन्हयामधील आरोपीस अटक केलेली आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास श्री निलेश तांबे पोलीस निरीक्षक हे करित आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक सो, सातारा, तुषार दोशी, मा. अपर पोलीस अधीक्षक सो, सातारा, श्रीमती वैशाली कडुकर, मा.उपविभागीय अधिकारी सातारा विभाग, सातारा श्री राजीव नवले, सातारा तालुका पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी श्री निलेश तांबे यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक श्री.सुदर्शन काटकर, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे श्री.अभिजीत गुरव पोलीस उपनिरीक्षक, पोहवा मनोज गायकवाड, पोहवा दादा स्वामी, पोकॉ संदिप पांडव, पोहवा राजू शिखरे, सफौ उमेश माने, पोहवा शिवाजी वायदंडे, पोहवा प्रविण वायदंडे, पोहवा रामचंद्र गोरे, पोहवा मालोजी चव्हाण, पोकॉ सुनिल भोसले, पोहवा अजित निकम, पोहवा रायसिंग घोरपडे, मपोहवा विदया कुंभार, पोहवा किरण निकम, पोकॉ संदिप फणसे, चापोकॉ शंकर पाचांगणे तसेच होमगार्ड विवेक शेडगे, विठठल सावंत, यश चव्हाण, नागराज भुजबळ, साहिल शेख, प्रसाद पवार, प्रसाद जाधव,निखिल सणस, श्रीधर भोईटे, प्रकाश चव्हाण, सिंधु ननावरे, वनिता कणसे यांनी केलेली आहे.

सर्व अधिकारी व कर्माचारी यांचे श्री. तुषार दोशी, पालीस अधिक्षक सातारा, श्रीमती वैशाली कडुकर, अप्पर पोलीस अधिक्षक सातारा, श्री राजीव नवले, मा. उपविभागीय अधिकारी , सातारा यानी कौतुक व अभिनंदन केले आहे.

पोलीस अधिक्षक सातारा यांच्या मान्यतेने

प्रति,

सर्व वृत्तपत्र संपादक, सातारा जिल्हा
सर्व मिडीया प्रतिनिधी सातारा